# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

वित्त व लेखा विभाग

आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट

## परिपत्रक

**संदर्भ :** वित्त विभाग परिपत्रक जा.क्र.वित्त/२०१३-१४/४२ दिनांक. १०.०४.२०१३.

या परिपत्रकाद्वारे सर्व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २०.११.२०१२ आणि ४.१२.२०१२ रोजी झालेल्या सभेमध्ये विद्यापीठातील सेवकांना वेतनाव्यतिरिक्त विविध भत्ते आणि मानधन देण्यासंदर्भात ठराव करण्यात आलेला होता. मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २५.०८.२०१४ रोजी झालेल्या सभेमध्ये सदर ठरावामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

**म : २९४/२५०८१४**

**असा ठराव करण्यात येतो की, विद्यापीठातील सेवकांना वेतना व्यतिरिक्त विद्यापीठ निधीतून देण्यात येणा-या विविध भत्त्यांची एका आर्थिक वर्षातील अधिकत्तम मर्यादा (सिलींग) आर्थिक वर्ष २०१४-१५ पासून खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.**

**अ. गट “अ” मधील अधिका-यांसाठी वेतनाच्या तीन पट.**

**ब. गट “ब” आणि गट “क” मधील अधिकारी/कर्मचा-यांसाठी वेतनाच्या चार पट.**

**क. गट “ड” मधील सेवकांसाठी अधिकत्तम रक्कमेची मर्यादा लागू राहणार नाही.**

वरील ठरावाची अंमलबजावणी मा. कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ पासून करण्यात येणार आहे. वेतनामध्ये मूळ वेतन आणि महागाई भत्ता यांचा समावेश असेल.

सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी भत्त्यांची किंवा मानधनाच्या रकमेची टिपणी मा. कुलगुरु यांना सादर करण्यापूर्वी वित्त विभाग (वेतन कक्षा) मार्फत भत्ता अथवा मानधनाची रक्कम व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा जास्त होत नाही, याची खातरजमा करण्यासाठी पाठविण्यात यावी.

सर्व विभागप्रमुख व प्रशासकीय शाखाप्रमुख यांना असे कळविण्यात येते की, वरील बदलाची नोंद घेण्यात यावी.

29/9

सीए विद्या गारगोटे,
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/२०१४-१५/२६१०
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१४

13/Bhosale/Circular